# महाराष्ट्र शासन
## कार्यालय : जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा परिषद, अकोला

रतनलाल प्लॉट, चौधरी विद्यालया जवळ,
जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अकोला.

दुरध्वनी क्रं : (०७२४)२४४०२५९ (कार्या)
E-mail :dtt_officeakola@rediffmail.com

आरोग्य सेवा
डॉ.जयश्री एम.बिपटे
वैद्यकिय अधिकारी,जिप्रके,अकोला


जा.क्र.जिप/आवि/जिप्रके/आहारवबिछायतदरपत्रक
२५-२६/३९२ /२५
दिनांक १०/११ /२०२५

(हस्ते/टपालाने/मेलव्दारे)

प्रति,

१. ..............................................................

२. ..............................................................

३. ..............................................................

विषय :- आहार व्यवस्था पुरविणेकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे रा.आ.अ.कार्यक्रमातर्गत **सन २०२५-२६** विविध प्रशिक्षणे,कार्यशाळा व सभाकरीता चहा, नास्ता,जेवन, व बिछायत व्यवस्था पुरविण्याकरीता आपणाकडुन भाव/दर बंद पाकीटातील दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर दरपत्रक खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन दि.२५/११/२५...रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यत जिल्हा परिषद,आरोग्य विभाग,जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अकोला येथे स्विकृत करण्यात येतील. प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता अथवा कार्यालयाचे सोईनुसार उघडण्यात येतील.

## निविदेच्या अटी व शर्ती

संस्थेच्या आहार व्यवस्था निविदा स्विकृत झाल्यापासून एक वर्षाचे कालावधीकरीता या कार्यालयांतर्गत वेळोवेळी घेण्यात येणा-या प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणादरम्यान व वास्तव्यास असणा-यांना आहार सुविधा पुरवावयाची आहे.

### अ) सर्वसाधारण माहिती :

1) अंदाजे रक्कम 5 लक्ष वर 5 टक्के प्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम रु 25,000/- वै.अ. जिप्रके,अकोला यांच्या नावे बँकेचा धनाकर्ष कार्यालयात जमा करावा लागेल भरणे अनिवार्य आहे.

2) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होणार नाही त्यांची सुरक्षा ठेवीची रक्कम कोणतेही व्याजाशिवाय निविदा प्रकिया संपल्यानंतर परत करण्यात येईल सदरहु रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

3) मागासवर्गीय संस्था/अपंग संस्था यांना बयाना रक्कम सुट मागावयाची असल्यास त्या संस्थेच्या नावानिशी शासन निर्णयाची प्रत जोडण्यात यावी.

4) कंत्राट कालावधीत कंत्राटदार यांचेकडुन कंत्राटमधील अटी व शर्तीचा भंग केल्यास,कंत्राट रदद झाल्यास कंत्राटदार नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील व त्यांचे/संस्थेचे नांव काळया सुचित टाकण्यात येईल.

5) निविदाधरकाने अटी व शर्ती असलेल्या निविदा फार्मच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच निविदादर दर्शविलेल्या पानावर स्वाक्षरी आवश्यक आहे.

6) निविदाकार/संस्था हयांचे पत्ता संबंधी पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/विद्युत बिल/बँक पासबुक यापैकी एक कागदपत्राची पुरावा म्हणुन छायांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

7) ज्या निविदाकार हयांचे दर अंतिमरित्या मान्य करण्यात येईल त्यांनी दर मान्यतेचे पत्र मिळाल्याचे दिनांकापासुन 7 दिवसांचे आंत सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करार

Scanned with OKEN Scanner

रु100/–चे स्टम्पपेपरवर करुन देणे अनिवार्य राहील. न केल्यास किंवा कामाची सुरुवात न केल्यास सदरची रक्कम जप्त करण्यात येईल. (उपलब्ध स्टम्पपेपर)

8) संस्थेकडे असलेल्या आहार व्यवस्था काम करण–यांचा तपशीलादाखल (कर्मचा–यांचे नांव, वय, शैक्षणिक पात्रता, यापूर्वी असलेल्या अनुभवाचा तपशील) स्वतंत्र यादी जोडण्यात यावी.

9) आहार व्यवस्था कार्यान्वित असतानाचे कालावधीत पुरेसे कर्मचारी उपस्थित राहतील अशी व्यवस्था करावी लागेल. तसेच आहार व्यवस्था पुरविणारे कर्मचा–यांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी इत्यादी बाबत या कार्यालयाचा कोणताही संबंध राहणार नाही.

10) निविदाधारकास असंवैधानिकरित्या निविदा मंजूर करण्याकरीता निविदा समितीवर कुठल्याही प्रकारे दबावतंत्राचा वापर करणे, तक्रारी करणे, प्रकरण न्यायप्रविष्ठ करणे इत्यादीचा वापर करता येणार नाही. तसेच राजकीय अथवा अनाठाई हस्तक्षेप करता येणार नाही. निविदाधारक त्यांची निविदा मंजूर करण्याकरीता दबावतंत्राचा वापर अथवा अनाठाई हस्तक्षेप करीत असल्याची निविदा समितीची खात्री पटल्यास, सदरहू निविदाधारकाची निविदा रदद करुन त्याचे नांव कायम काळया यादीमध्ये टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

## ब) निविदा उघडणे :

1) ई दरपत्रक दिनांक २५/११/2025 रोजी दु.4.00 वाजता जिल्हा प्रशिक्षण केंद्र, अकोला, जिल्हा स्त्री रुग्णालय, परिसर, अकोला येथे दरपत्रक सादर केलेल्या निविदाधारकांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. विहित तारीख व वेळेत निविदाधारकांनी उपस्थित राहावे याकरीता वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. तसेच दिलेल्या तारीख बदल करण्याचा अधिकारी समितीने राखून ठेवले आहेत.

2) लिफाफा क्र.1 व लिफाफा क्र.2 बाबीचे दर सर्व करांसह/खर्चासह दरपत्रक जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा परिषद, अकोला यांचे कार्यालयात सादर करावे.(सुटीचे दिवस वगळता)

3) प्रथम लिफाफा क्र.1 उघडण्यात येईल. त्यामध्ये मागीतलेल्या प्रमाणपत्राची पूर्तता झाल्यावर अथवा जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्र/दस्तऐवज समाधानकारक असल्याचे आढळल्यावरच लिफाफा क्र.2 उघडण्यात येईल.( दर सर्व दर करासह रक्कम भरण्यात यावी) लिफाफा क्र.1 मधील प्रमाणपत्रावर समितीचा आक्षेप असल्यास दरपत्रक ग्राहय धरल्या जाणार नाही.

4) मंजुर दरपत्रक कालावधी मध्ये कोणतेही कर लागु झाले/वाढुन आलेस मंजुर दरपत्रकती दर वाढुन मिळणार नाही. सदर सर्व कर भरण्याची जबाबदार निविदाधारकांची राहील.

5) स्विकृत करणे, नाकारणे तसेच अटीमध्ये शिथीलता करण्याचे अधिकार किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार समितीने राखून ठेवले आहेत.

## क) अटी व शर्ती :

1) आहार व्यवस्थाबाबत कोणत्याही प्रशिक्षणार्थी/अधिकारी, कर्मचारी, किंवा परिसरात राहणा-या निवासस्थानातील कर्मचा–याकडुन तक्रार येता कामा नये, याबाबत नोंद घ्यावी.

2) **कंत्राटाचा कालावधी आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता राहील. मुदतपूर्तीनंतर गुणवत्ता व आर्थिक निकष तपासून पुढील कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा अधिकार निविदा समितीकडे राखून ठेवण्यात येत आहे.**

3) निविदाधारकाने सदर कामासाठी उपठेकेदार नेमु नयेत. उपठेकेदार नेमलेचे निर्देशनास आल्यास सदरहु कत्राट रदद करण्यात येईल.

4) प्रशिक्षणाव्यतिरीक्त वास्तव्यास असलेल्या व्यक्तींना सुध्दा दरपत्रकत दर्शविलेल्या दरानुसारच जेवण/चहा/नास्ता पुरविणे अनिवार्य आहे.

5) प्रशिक्षणाकरीता संबंधित येणा–या प्रशिक्षणार्थ्यांच्या संख्येनुसार व मंजुर तरतुद नुसार जेवण पुरविण्याचे आदेश देण्यात येतील.(प्रशिक्षणाचा मेनु बदल करणे व न करणे या बाबत प्रशिक्षण समन्वयकाकडून करावा) परंतु काही कारणास्तव प्रशिक्षणार्थींची संख्या

Scanned with OKEN Scanner

संख्येनुसारच देयकाची अदायगी प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक सुचनान्वये मंजुर तरतुदीच्या अधिन राहुन करता येईल. तसेच देयक कार्यालयास सादर करण्यापूर्वी प्रशिक्षण समन्वयकाकडून देयक प्रमाणित/पडताळणी केल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल.( टिडीएस व जीएसटी कपातीसह)

6) आहारासंबंधी पुरवायाची सुविधाबाबतचे दर पीण्याच्या पाणी सह ( पाण्याची कॅन) ग्रहया धारण्यात येतील व त्याव्येतिरीक्त दर मंजुर करण्यात येणार नाही.

7) आहार सेवा मध्ये पदार्थ दररोज वेगवेगळे देणे आवश्यक

8) सदर शासनाकडुन मंजुर व अनुदान उपलब्ध झाले तरच कंत्राटी आहार सेवा सुरु ठेवली जाईल

9) कोणत्याही परिस्थितीत अग्रीम संस्थेकडुन दिला जाणार नाही.

10) पुरवठा आदेश दिल्यापासुन आहार सेवा उत्तम प्रतिचे साहित्य व सिजवलेले/बनविलेले अन्न प्रशिक्षणाच्या ठिकाणी पुरवठा करणे तसेच त्याबाबत कोणतेही वाहतुक,मजुरी व इतर खर्च देण्यात येणार नाही.

11) काही कारणास्तव आहार सेवा पुरविण ठेकेदारास शक्य नसल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे त्यानंतर करार संपुष्टात येईल.

12) विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रशिक्षणार्थीना चहा, फराळ, अल्पोहाराची व्यवस्था व जेवणाची सोय करावी लागेल.

13) कंत्राटदराने विहित कालावधी पुर्ण न करता कंत्राट सोडुन दिल्यास अथवा नियम, अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करुन शासनास जमा करण्यात येईल.

14) आहार व्यवस्थेसंबंधीत खाद्य पदार्थ, चहा व भोजन तयार करण्याकरीता उत्कृष्ट दर्जाचे (आयएसआय ब्रॅड अथवा तत्सम) मटेरीयल (तांदुळ, गहू, दाळी, तेल इत्यादी) असावे, पदार्थ्याचा निकृष्ठ दर्जा आढळल्यास वा काही तक्रार प्राप्त झाल्यास, त्याची खातरजमा करुन तकारीमध्ये तथ्य आढळल्यास कंत्राट तात्काळ प्रभावाने रदद करुन अमानत रक्कम जप्त करण्यात येईल. कंत्राटदाराला त्वरीत मेसचा कंत्राट सोडावा लागेल.

15) आहार व्यवस्थाबाबतचे उदभवलेल्या कोणत्याही प्रकारच्या तकारीला कंत्राटदार जबाबदार राहील.

16) या संस्थेअंतर्गत वेळोवेळी होणा-या प्रशिक्षण, सभा, कार्यशाळा इत्यादी करीता कार्यालयाचे आदेशानुसार प्रतिनिधीची जेवणाची व नास्ता चहाची व्यवस्था करावी लागेल, आरोग्य विभागामधील वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना निविदेमध्ये दर्शविलेल्या दरानुसार जेवणाची, चहा, नास्ताची योग्य प्रकारे व्यवस्था करणे बंधनकारक राहील. याकरीता कोणत्याही परिस्थितीत वेगळे दर आकारण्याची मुभा देण्यात येणार नाही.

17) आहार सेवेचे वेळापत्रक सकाळचे चहा व नास्ता 8.00 ते 10.00, दु.जेवण 2.00 ते 3.00,दु.चहा 4.00 ते 5.00,रात्रीचे जेवण 7.30 ते 8.00

18) कार्यालयामार्फत देण्यात आलेले फर्निचर, इतर यांची योग्य प्रकारे निगा ठेवण्यात यावी, साहित्य हरविले, तूटले किंवा कुठल्याप्रकारचे नुकसान झाल्यास त्यांची संपूर्ण रक्कमेची वसुली कंत्राटदाराकडुन करण्यात येईल. कंत्राट कालावधीत कंत्राटदारास स्वयंपाकास आवश्यक गॅस कनेक्शन आणि रेफ्रीजिरेटर सारख्या सुविधा स्वतः उपलब्ध करुन घ्याव्या लागतील.

19) आहार व्यवस्था परिसरात एकुण निटनिटकेपणा, स्वच्छता इत्यादी ठेवणे आवश्यक आहे. उपहारगृह स्वच्छता ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. आहार व्यवस्थेत धान्य व ईतर वस्तु निटनेटके व व्यवथित रचुन ठेवणे आवश्यक राहील.

20) शासकिय नियमानुसार व सुचने नुसार आहार व्यवस्था पुरविण्याच्या ठिकाणी व परिसरात धुम्रपान करणे, दारु पिणे, व थुंकणे यावर बंदी आहे. याची स्पष्ट नोंद घ्यावी. याचे उल्लंघन झाल्यास त्याची गंभीर दखल घेउन कारवाई करण्याचे अधिकार समितीने राखून ठेवले आहेत.

21) आहार व्यवस्था केवळ कार्यालयीन प्रशिक्षणार्थी आणि सभा, कार्यशाळेस व इतर उपस्थित राहणा-या व वास्तव्यास असणा-या अधिकारी व कर्मचा-यांकरीता आहे. कोणत्याही परिस्थितीत उपहारगृहाचा व्यवसाय/ व्यापारिक उददेशासाठी वापर करता येणार नाही.

22) आहार व्यवस्थाबाबतचे काम करणारे कर्मचारी यांची निटनेटकेपणा व स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदारास करावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

23) आहार व्यवस्थाबाबतचे काम करणा–या कर्मचा–यांची प्रशिक्षणार्थी व अधिका–यांशी वर्तणूक सौजन्याची व सौहार्दपूर्वक राहील याची दक्षता घ्यावी. कर्मचा–याने अशोभनीय वर्तन केल्यास याची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील व कंत्राट तात्काळ प्रभावाने रदद करण्यात येईल.

24) कंत्राट कालावधीत आहार व्यवस्था पुरविणारे कार्यरत कर्मचा–यांना देण्यात येणारे वेतन हे किमान वेतन अधिनियम 1948 चा भंग करणार नाही याची निविदाधारकाने हमी देणे आवश्यक आहे. तसेच सदरहु कार्यालया जबाबदार राहाणार नाही.

25) संबंधित आहार पुरवठादारास व त्यांच्या कर्मचा–यांना कत्राट स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच शासन सेवेत कोणतेही हक्क राहणार नाहीत. याबाबत ठेकेदाराने संबंधीत कत्राटी कर्मचा–यांना पुर्वकल्पना दयावी याबाबत काही वाद निर्माण होणार नाहीत याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

26) शासनाकडून आकारण्यात येणारे कर, सेवाशुल्क व इतर आकारणी यांची वसूली कंत्राटदाराकडून करण्यात येईल.

27) आपली सेवा असमाधानकारक तसेच मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने नसल्याचे आढळल्यास कोणतेही कारण न देता आपले कंत्राट कोणत्याही क्षणी रदद करण्याचे अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहेत. तसेच कंत्राट रदद झाल्याच्या परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम पूर्वसुचना न देता जप्त करण्यात येईल.

28) कंत्राट दाराने नेमलेल्या कर्मचा–यांच्या विम्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच नेमलेल्या कर्मचा–यास अपघात किंवा जिवित हानी झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

29) कंत्राटदाराच्या निविदाबाबत काही तक्रारी असल्यास जिल्हा सत्र न्यायालय, अकोला पुरतेच मर्यादीत राहील.

30) आहार व्यवस्थाबाबत जेवण घेणा–यांना अन्नविषबाधा होउन शारीरिक/जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

31) निवड केलेल्या पुरवठाधार यांचा सदर दर आरोग्य विभाग जि.प/रा.आ.अ/कार्यालय व अधिनस्त संस्था यांना सुद्धा अधिग्रहीत करण्याचे अधिकारी खालील स्वाक्षरी कत्यांनी राखुन ठेवले आहे.

**ड) ठेकेदारांना पुरविण्यात येणा–या सोयी :**

1) पाणीपुरवठा.
2) साहित्य ठेवण्याकरीता एक स्टोअर रुम.

**ठ) आहार व्यवस्थेचे संनियंत्रण :**

आहार व्यवस्थाबाबत संनियंत्रण करण्याकरीता खालील सदस्यांची समिती राहील. ही समिती वेळोवेळी आवश्यकतेनुसार आहार व्यवस्थाबाबची गुणवत्ता पडताळणी करेल.

1) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद, अकोला.
2) वैद्यकिय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, अकोला.
3) आहार तज्ञ
4) पथक सदस्य, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, अकोला.
5) ठेकेदाराने नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी.

संनियंत्रण समितीस वेळोवेळी गुणवत्ता पडताळणी व त्याअनुषंगाने कंत्राटदारास आवश्यक आदेश देण्याचे संपूर्ण अधिकार राहतील व कंत्राटदाराने/कर्मचा–यास समितीचे आदेश पाळणे बंधनकारक राहील.

17.11.25

**वैद्यकिय अधिकारी**
**जिल्हा प्रशिक्षण केंद्र,**
**जिल्हा परिषद, अकोला.**

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा पषिद, अकोला.**

Scanned with OKEN Scanner

लिफाफा क्र.1 मध्ये तांत्रीक कागदपत्रजोडणे आवश्यक राहील

1) पॅन कार्ड प्रत
2) संस्थेची आस्थापना/दुकान रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी. (चालू वित्तीय वर्षाकरीता अद्यावत व नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र अनिवार्य आहे.)
3) प्राप्तीकर सन सन 2023–24, 2024–25 भरल्याबाबत प्रमाणपत्र/दाखला जोडण्यात यावा.
4) शासकीय संस्थेत/शासकीय वसतीगृहात/कार्यालयात भोजनालय/उपहारगृह चालवण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील. भोजनालय/उपहारगृह चालवण्याचा अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.
5) निविदा धारकाचे/कंत्राटदाराचे नाव शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेली नाही याबाबत प्रमाणपत्र निविदाधारकाने स्वतः चे हमीपत्र देणे आवश्यक आहे.
6) जी.एस.टी.प्रमाणपत्र/जी.एस.टी लागु नसेल त्याबाबतचे प्रमाणपत्र.
7) अन्न व औषधी प्रशासन वैद्य परवाना.
8) लिफाफा क्र.1 ( छायांकित प्रत सत्यापीत सादर करणे) व क्र.2 अटी व शर्ती मान्य असलेबाबत निविदाधारकाची सही व शिक्का सहीत
9) लिफाफा क्र.1 दर्शनी भागावर तांत्रीक कागदपत्रे व लिफाफा क्र.2 आहार दर असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा

17-11-25

वैद्यकिय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र,
जिल्हा परिषद, अकोला.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, अकोला.

Scanned with OKEN Scanner

(लिफाफा–क 2)

## वित्तीय बोली नमुना

| आशा प्रशिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क. | विवरण | प्रति नग | अंदाजे दर | प्रतिव्यक्ती दर (150/- रुपये) |
| 1 | चहा (दोन वेळेचा) | प्रति कप | १२-१५/- | |
| 2 | अल्पोपहार/नास्ता:- (कांदेपोहे/उपमा/ब्रेड वाडा/वाडा पाव/मुंग वाडा/ढोकळा/मटकी, इत्यादी (वरील नास्ता चटणीसह-टमाटर सॉस व तळलेली मिरची) | प्रति प्लेट | २३-२५/- | |
| | उपवास:- (भगर/साबुदाणावडा/साबुदाणा उसळ, इत्यादी) | प्रति प्लेट | | |
| 3 | **पूर्ण जेवण (दुपारचे):-** चपाती (तवा रोटी), भात,वरण, दोन भाजी,सलाद, लोणचे.व एक गोळ पदार्थ (जिलेबी,बालुशाही,लाडु,इत्यादी ) | प्रति थाली | ६७-७०/- | |
| 4 | **पुर्ण जेवणमध्ये (संध्याकाळचे):-** चपाती , भात, वरण, एक कोरडी/पातळ भाजी, (चना/चवळी/मटकी/राजमा/वटाणा इत्यादी.), सलाद, लोणचे. | प्रति थाली | ३८-४०/- | |
| | | | प्रतिव्यक्ती प्रतिदिवस एकूण अ.क.1 ते 4 | |

| पॅरामेडीकल प्रशिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क. | विवरण | प्रति नग | अंदाजे दर | प्रतिव्यक्ती दर (200/- रुपये) |
| 1 | चहा (दोन वेळेचा) | प्रति कप | १४-१५/- | |
| 2 | अल्पोपहार/नास्ता:- (कांदेपोहे/उपमा/आलूवडा/ब्रेड वाडा/ वाडा पाव/मुंग वाडा/ढोकळा/ समोसा/कचोरी/ मटकी/मिसळ (दोन पाव),इत्यादी (वरील नास्ता चटणीसह-टमाटर सॉस व तळलेली मिरची) | प्रति प्लेट | २७-३०/- | |
| | उपवास:- (भगर/साबुदाणावडा/साबुदाणा उसळ +दही, व मोसमी फळे, इत्यादी) | प्रति प्लेट | | |
| 3 | **पूर्ण जेवण (दुपारचे):- :-** चपाती (तवा रोटी),भात,वरण,दोन भाजी (कोरडी,पातळ भाजी) दही/मठ्ठा,सलाद/कोशिंबीर,पापड,लोणचे. व एक गोळ पदार्थ (जिलेबी,बालुशाही,गुलाबजाम,लाडु,यापैकी एक) | प्रति थाली | ९२-९५/- | |
| 4 | पुर्ण जेवणमध्ये (संध्याकाळचे):- चपाती , भात, वरण, एक कोरडी/पातळ भाजी, (चना किंवा चवळी किंवा मटकी किंवा राजमा किंवा वटाणा इत्यादी.), सलाद, लोणचे. | प्रति थाली | ५७-६०/- | |
| | | | प्रतिव्यक्ती प्रतिदिवस एकूण अ.क.1 ते 4 | |

Scanned with OKEN Scanner

| वैद्यकिय अधिकारी प्रशिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क. | विवरण | प्रति नग | अंदाजे दर | प्रतिव्यक्ती दर (250/-रुपये) |
| 1 | चहा/ कॉफी (दोन वेळेचा) | प्रति कप | १४-१५/- | |
| 2 | अल्पोपहार/नास्ता:- (कांदेपोहे/उपमा/आलूवडा/ब्रेड वाडा/ वाडा पाव/मुंग वाडा/ढोकळा/ सांबरवडा/दोसा/ समोसा/कचोरी/शिरा/ मटकी/मिसळ (दोन पाव)/इडली चटणी सांबार (दोन इडली-१ वाटी चटणी/सांबार) व्हेज मन्चुरियन,इत्यादी (वरील नास्ता चटणीसह-टमाटर सॉस व तळलेली मिरची) | प्रति प्लेट | २८-३०/- | |
| | उपवास:- (उपसाची भाजणी पोळी + आलुची भाजी भगर/साबुदाणावडा/साबुदाणा उसळ + दही,इत्यादी व मोसमी फळे,ईत्यादी) | प्रति प्लेट | | |
| 3 | पूर्ण जेवण (दुपारचे):- चपाती (तवा रोटी),जीरा भात/पुलाव,वरण/दालफ्राय,एक कोरडी भाजी, एक पातळ भाजी ई.) दही/मठ्ठा/,सलाद/कोशिंबीर,पापड,लोणचे.व एक गोळ पदार्थ (बासुंदी,जिलेबी,बालुशाही,गुलाबजाम,लाडु,श्रीखंड यापैकी एक) | प्रति थाली | १२६-१३०/- | |
| 4 | पुर्ण जेवणमध्ये (संध्याकाळचे):- चपाती , भात, वरण, एक कोरडी/पातळ भाजी, (चना किंवा चवळी किंवा मटकी किंवा राजमा किंवा वटाणा इत्यादी.), सलाद, लोणचे. | प्रति थाली | ७२-७५/- | |
| | प्रतिव्यक्ती प्रतिदिवस एकूण अ.क.1 ते 4 | | | |

| विषेश प्रसंगी (अधिकारी व कर्मचारी) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क. | विवरण | प्रति नग | अंदाजे दर | प्रतिव्यक्ती दर रुपये |
| 1 | आईस्क्रिम (मोठा कप) | प्रति कप | २०-२५/- | |
| 2 | स्पेशल चहा व बिस्कीटसह | प्रति कप | १३-१५/- | |
| 3 | स्पेशल नास्ता (फुल):- (वाडा रसा (दोन नग)/आलूवडा रसा (दोन नग) / ब्रेड वाडा रसा (दोन नग) /वाडा पाव रसा (दोन नग) /मुंग वाडा रसा (दोन नग) /पुरी भाजी/पाव भाजी (दोन नग) /दोसा/समोसा (दोन नग) /मिसळ (दोन पाव)/ चायनिस स्पेशल-व्हेज हका नुडलस्,मंच्युरियन लिक्वीड, इत्यादी (वरील नास्ता चटणी,टमाटर सॉस व तळलेली मिरची) | प्रति प्लेट | ७०-८०/- | |
| 4 | स्पेशल ताट:- चपाती (तवा रोटी),जीरा भात,दालफ्राय, एक कोरडी भाजी (चना/चवडी/मटकी/राजमा/वटाणा ई.),एक पातळ भाजी,एक पनिर भाजी,आमटी,दही/मठ्ठा, सलाद/कोशिंबीर,पापड,लोणचे.व सुप(पालक,व्हेजिटेबल सुप टमाटर,मशरुम,मंचुरीयन ई.यापैकी एक),दोन गोळ पदार्थ( बासुंदी,जिलेबी,बालुशाही,गुलाबजाम,लाडु, श्रीखंड,ई.यापैकी दोन) | प्रति थाली | २५०-२६०/- | |

Scanned with OKEN Scanner

| अ.क. | विवरण | प्रति नग | अंदाजे दर | प्रतिव्यक्ती दर रुपये |
|---|---|---|---|---|
| 5 | नॉनव्हेज (अंडाकरी ताट):- चपाती/भाकरी/तं.रोटी,अंडाकरी,मसाला भात,कांदा,लिंबु | प्रति थाली | १५०-१७०/- | |
| 6 | नॉनव्हेज (मटन ताट):- चपाती/भाकरी/तं.रोटी,मटन भाजी, जिरा भात,कांदा,लिंबु | प्रति थाली | २९०-३००/- | |
| 7 | नॉनव्हेज (चिकन ताट):- चपाती/भाकरी/तं.रोटी,मटन भाजी, मसाला भात, कांदा,लिंबु | प्रति थाली | २४०-२५०/- | |
| 8 | नॉनव्हेज (फिश ताट):- चपाती/भाकरी/तं.रोटी,मटन भाजी, भात,कांदा,लिंबु | प्रति थाली | २९०-३००/- | |
| 9 | डिनर:- (राईस प्लेट) मर्यादीत चार चपाती/दोन भाकरी,वरण,भात,भाजी,लोणचे, कांदा,लिंबु | प्रति थाली | १३०-१४०/- | |

17.11.25

वैद्यकिय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र,
जिल्हा परिषद, अकोला.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा पषिद, अकोला.

Scanned with OKEN Scanner